सोमवार दि.१५ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २३४
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com    Lokneta News - लोकनेता न्युज    8459977904    www. lokneta.com

# दानवे यांना शिवसेना ठाकरे गटाच्या नेतेपदी बढती

# चंद्रकांत खैरेंनंतर छत्रपती संभाजीनगरात दुसरे नेतेपद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

राज्याच्या राजकारणात छत्रपती संभाजीनगरचे महत्त्व वाढत आहे. केंद्रीय मंत्री, राज्यातील ३ कॅबिनेट मंत्री, विरोधी पक्षनेते पद संभाजीनगरमधील नेत्यांना मिळाले आहे. यात आता राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची शिवसेना ठाकरे गटाच्या नेतेपदी निवड झाली आहे. यापूर्वी चंद्रकांत खैरेंच्या रुपाने मराठवाड्याला शिवसेनेचे नेतेपद मिळाले, तर आता अंबादास दानवे यांच्या रुपाने अजून एक नेते पद संभाजीनगर शहराला मिळाले आहे.

दरम्यान आमदारांच्या बंडानंतर शिवसेनेत २ गट निर्माण झाले. त्यात उद्धव ठाकरे यांच्यासोबत केवळ १५ आमदार राहिले. काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या कार्यकारणीचा विस्तार करत ६ जणांची नेतेपदी वर्णी लावली. यानंतर आता छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा-प्रमुख अंबादास दानवे यांची शिवसेना (णइढ) नेते पदी निवड करण्यात आली आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेतेपदी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. माजी आमदार निर्मला गावीत यांची शिवसेना उपनेतेपदी तर हिंदी भाषिक सामाजिक नेते पंडित अवधेश शुक्ल यांची राज्य संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे विश्वासू अशी ओळख असलेले दानवे हे सर्वाधिक काळ जिल्हाप्रमुख राहिलेले नेते म्हणून देखील ओळखले जातात. भाजपमधून शिवसेनेत आलेल्या दानवे यांनी आपल्या



कर्तृत्वाच्या जोरावर पक्षात आपले भक्कम असे स्थान निर्माण केले. जिल्हाप्रमुख, विधान परिषद सदस्य विरोधी पक्षनेते, राज्य प्रवक्ते, आणि आता शिवसेना नेते असे अनेक पदे त्यांना उद्धव ठाकरेंकडून सध्या देण्यात आली आहे.मनोहर जोशी, लीलाधर डाके, दिवाकर रावते, सुभाष देसाई, आदित्य ठाकरे, संजय राऊत, चंद्रकांत खैरे, अनंत गीते, अरविंद सावंत, भास्कर जाधव, विनायक राऊत, अनिल देसाई, अनिल परब, राजन विचारे, रवींद्र वायकर, सुनील प्रभू खासदार विनायक राऊत, अनिल देसाई, अनिल परब, राजन विचारे, रवींद्र वायकर, सुनील प्रभू यांच्यासह आता विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना शिवसेना नेतेपदी संधी मिळाली आहे.छत्रपती संभाजीनगर लोकसभ मतदारसंघातून आपण गेली १० वर्षे इच्छुक आहोत, असे म्हणत अंबादास दानवे यांनी उमेदवारी मिळावी अशी मागणी उद्धव ठाकरेंकडे केली होती. मात्र, चंद्रकांत खैरेंना पुन्हा संधी देत लोकसभेचे तिकीट जाहीर करण्यरत आले. यानंतर मी संभाजीनगरपुरता मर्यादित नाही मला महाराष्ट्रभर फिरावे लागणार, असे म्हणत अंबादास दानवेंनी पक्षासाठी काम करणार असल्याचे जाहीर केले होते.लोकसभा निवडणुकीच्या तिकिटावरून शिवसेना नेते खैरे व विधान परिषदेचे विरोधी पक्षनते दानवे यांच्यात सुरवातीला संघर्ष झाला. त्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मध्यस्थी केल्यानंतर हा वाद थांबला. दानवे यांनी खैरे यांच्या घरी जाऊन त्यांना पेढे भरवत वादाला पूर्णविराम दिला. त्यानंतर संघटनात्मक नेमणुकीवरून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख किशनचंद तनवाणी नाराज झाले. दानवे-खैरे संघर्ष मिटल्यानंतर आता खैरे यांनी दानवे-तनवाणी यांना एकत्र आणत पक्षात सर्व आलबेल असल्याचा संदेश दिल्यानंतर ही निवड करण्यात आली आहे.

# युवा सेनेच्या उपप्रमुखाला जीवे मारण्याची धमकी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**



मलकापूर येथील शिवसेना उबाठा चे युवा सेना उपप्रमुख शेख यासीन यांना सामाजिक कामे करण्यात मज्जाव करून अश्लील शिवीगाळ करून जर तू आमच्या वॉर्डातील विकास कामे करून घेतली तर तुला आपला जीव गमावा लागेल अशी धमकी काँग्रेस नेत्याच्या नातेवाईकांनी दिल्याचे वृत्त आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की पारपेठ मधील भालेगाव, देवधाबा रस्त्यावरील मिल्लत नगर येथील जनित्र जळाल्याने तेथील नागरिकांनी शेख यासीन कडे विद्युत पुरवठा सुरळीत करण्या साठी मागणी केल्याने शेक यासीन यांनी ही बाब माजी नगराध्यक्ष रावळ यांना सांगितले. सहकार्यातून नवीन जनित्र बसविले व विद्युत पुरवठा सुरळीत केला त्यामुळे या भागात राहणाऱ्या एका काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या नातेवाईकांनी शेख यासीनला अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत भा रा काँग्रेस व शिवसेना उबाठाची युती असताना या दोन पक्षांमध्ये वाद निर्माण झाला आहे.

# ईंद्रलोक बौध्दजन सेवा संघ आयोजित १३३ वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**राकेश साळवी । मीरा-भाईंदर**

दि.१४ सर्वांना समान न्याय, समता व बंधुत्वाच्या विचारांची प्रेरणा देऊन देशाला संवैधानिक दिशा देणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दरवर्षी १४ एप्रिल रोजी जगभरात साजरी केली जाते. यंदा संपूर्ण जग त्यांची १३३ वी जयंती साजरी करत आहे. भाईंदर पुर्व येथील ईंद्रलोक २ मधिल इंद्रलोक बौध्दजन सेवा संघ आयोजीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ही दर वर्षी प्रमाणे या वर्षी ही अतीशय उत्साहात साजरी केली गेली. ईंद्रलोक बौध्दजन सेवा संघ आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती ही मीरा-भाईंदर मधील एक आकर्षण चे कारण ठरले.

उत्कृष्ट आणि प्रभावशाली असा देखावा तयार करण्यात आला होता. स्टेजच्या सभोवताल रंग बिरंगी विद्युत रोषणाई, सुशोभीकरण तसेच प्रवेश द्वार मोठे बॅनर्स आणी लाईटने सजवण्यात आले होते.कार्यक्रमास उपस्थित स्त्री पुरूष तसेच लहान मुले अतिशय उत्साहात होती.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.० वा. बुध्दवंदना - सुत्रपठण ने करण्यात आली. तसेच १.०० वा. धम्म प्रवचन ठेवण्यात आले होते. सायंकाळी ७.०० वा. सुजित कासारे प्रस्तुत मराठी गाण्याचा / न्रृत्य कार्यक्रम (ऑर्केस्ट्रा) तसेच स्नेहभोजन




होते. आमदार श्री. प्रताप सरनाईक, मा. आमदार श्री.नरेंद्र मेहता, मा. श्री. खासदार संजीव नाईक, कु. आकांशाताई विरकर, श्री. शंकरभाई विरकर तसेच बरीच राजकीय व सामाजिक मंडळांनी महामानवाच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन नागरिकांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. संघाचे अध्यक्ष श्री.शशिकांत शिंदे , सचिव श्री.सुनिल गमरे, खजिनदार श्री.राकेश पवार, कार्याध्यक्ष श्री. राजेश गमरे, वरीष्ठ सल्लागार श्री. चरण पवार, श्री. देवधर सकपाळ श्री. सुरेश पवार, मंगेश जाधव, विशाल पवार, राजु पवार, अनिल पवार, निशांत पवार तसेच बर्याच पतअधिकारी आणि सभासद यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अतिशय उत्साहात आणि धुमधडाक्यात पार पडला.

# महाविकास आघाडीचे नेते रावेर व जळगाव हे मतदारसंघ भाजपा मुक्त करणार अशी चर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर :- रावेर लोकसभा निवडणुकीत हा मतदार संघ महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाला या मतदारसंघात उमेदवारांची उमेदवारांचा वानवा असल्याने अखेर राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी या मतदारसंघात मराठा समाजाचे वर्चस्व असल्याने त्यांनी श्रीराम दयाराम पाटील यांच्या नावाची घोषणा केली.

श्रीराम पाटील हे श्री साई राम प्लास्टिक अँड इरिगेशन व शिकाया इलेक्ट्रॉनिक टू व्हीलर उत्पादक कंपनीचे मालक असुन यशस्वी उद्योजक आहेत त्यामुळे त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे रावेर लोकसभा मतदार संघात श्रीमती रक्षा खडसे सन २०१४ व सन २०१९ या दोन निवडणुकीत सलग दोन वेळा निवडून आलेल्या आहेत सन २०१४ साली त्यांची मुख्य लढत राष्ट्रवादीचे उमेदवार मनीष जैन तर सन २०१९ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार व माजी खासदार डॉक्टर उल्हास पाटील यांच्याशी लढत झाली त्यात या दोन्ही उमेदवारांच्या पाडाव करीत श्रीमती खडसे यांना विजयश्री प्राप्त झाली.

भाजपात आता तिसऱ्यांदा श्रीमती खडसे यांची उमेदवारी घोषणा केल्यानंतर राष्ट्रवादीने श्रीराम पाटील यांची उमेदवारीने कित्येकांच्या





पोटातील शुळ नजरेस पडला तर राष्ट्रवादीला एक खंदा व योग्य उमेदवार मिळाल्याची चर्चा रावेर मतदारसंघात सुरू आहे तर ते उद्योजक म्हणून प्रसिद्ध असल्याने ते या मतदार संघात विकासाची गंगा अवतीर्ण करतील असाही प्रवाह सुरू आहे महाविकास युतीत शिवसेना (उबाठा) आहे आणि या शिवसेनेने निवडणुकीच्या रणधुमाळी शिवसेना (शिंदे गट) व भाजपा या दोन्ही पक्षांना दे धक्का म्हणून याच पक्षातील कित्येकांना शिवबंधन बांधले असल्याने रावेर लोकसभा व जळगाव लोकसभा मतदार संघातील भाजपच्या उमेदवार असलेल्या महिलांची यावेळेस गच्छंती होणार असे चित्र स्पष्ट दिसत आहे

महाराष्ट्रात लोकसभेच्या एकूण ४८ जागा असून त्यापैकी शिवसेनेने २१ ठिकाणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १७ ठिकाणी तर राष्ट्रवादीने फक्त दहा ठिकाणी आपले उमेदवार दिलेले आहेत आणि आपले उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी शिवसेनेचे उद्धव ठाकरे शरदचंद्र पवार व काँग्रेसच्या नेत्यांनी घेतली आहे तरी याच निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकी आल्या तर लोकसभा निवडणुकीचा पडसाद उमटणार असा सूर निघत असल्याने महाराष्ट्रातून भाजप हटाव हा एक सूत्री कार्यक्रम महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आखला असल्याचे दिसत आहे महाराष्ट्रातील कित्येक जागेवर भाजपाला आपला उमेदवार निवडून येणार की नाही याची शाश्वती नाही तर महाविकास आघाडी आपले सर्वच्या सर्व उमेदवार विजयी होणार यासाठी आकाश पातळ एक करणार आणि रावेर जळगाव लोकसभा मतदारसंघ भाजपा पासून सोडविणार असे चित्र दृष्टीक्षेपात येत आहे

# शतक महोत्सवी वर्षात आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या अहिंसा यात्रेचे कडा येथील अमोलक जैन विद्यालयात आगमन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संप्रदायाचे अकरावे आचार्य युगप्रधान श्री महाश्रमाणजी यांच्या अहिंसा यात्रेचे आगमन गुरुवार दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा येथे होत आहे. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने दिवसभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे कार्यक्रम सर्व धर्मीयांसाठी खुले ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ तसेच श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांच्यावतीने देण्यात आलेली आहे. आपल्या कड्यासारख्या ग्रामीण भागात प्रथमच युगप्रधान आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या अहिंसा यात्रेचे आगमन होत आहे. त्यांच्यासोबत १०० साधू-साध्वी असून कडा आणि कडा परिसरातील नागरिकांना इतक्या मोठ्या संख्येने साधु-साधविंच्या दर्शनाचा लाभ मिळणार असल्याने त्यांच्या दिव्य दर्शनासह अनमोल मार्गदर्शनासाठीची विशेष व्यवस्था करण्यात आलेली आहे. आचार्य श्री महाश्रमणजी हे आत्मकल्याणासह, लोककल्याण आणि परोपकार यावर विशेष



भर देत असून, अहिंसा यात्रेच्या माध्यमातून नैतिकता, प्रामाणिकता, अहिंसा, सदाचार आणि नशामुक्तीची प्रेरणा देऊन जनमानसात नवा उत्साह निर्माण करतात. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ ही संस्था परमपूज्य श्री अमोलक ऋषीजी महाराज साब यांच्या शुभहस्ते सन १९२४ मध्ये सुरू करण्यात आलेली असून, ही संस्था आपले शतक महोत्सवी वर्ष साजरे करत असतानाच १०० साधू-साधवींचे आगमन या संस्थेमध्ये होत असल्याने हा या संस्थेसाठी दुग्धशर्करा योग असल्याचे संस्था पदाधिकाऱ्यांनी सांगितले. सकाळी ९:३० वाजता युगप्रधान आचार्य श्री महाश्रमणजींच्या अमृतवाणीतून दिव्य प्रवचनाचा सोहळा सुरू होईल. दुपारी १ ते २ दरम्यान सर्व धर्मीयांसाठी दर्शनाचा विशेष सोहळा आयोजित करण्यात आलेला असून इतर विविध विषयांवर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानंतर रात्री ८ ते ८:३० या वेळेत आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या चरणस्पर्शाचा विशेष सोहळा संपन्न होईल. कड्यासारख्या ग्रामीण भागामध्ये प्रथमच येत असलेल्या युग प्रधान आचार्य श्री महाश्रमणजी यांच्या स्वागतापासून दिवसभरातील सर्व कार्यक्रमांचा कडा आणि परिसरातील जिज्ञासू भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ आणि श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## शैक्षणिक पालकत्व स्वीकारून

# समाधान देशमुख यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेडराजा । ज्ञानेश्वर बुधवत**

येथील शिवाजी जाधव हे गेल्या अनेक वर्षापासून दूर्धर आजाराने ग्रस्त असून ते घरातील एकमेव कमावते पुरुष होते परंतु त्यांच्या दुर्धर आजारामुळे त्यांच्या कुटुंबाच्या पालन पोषणाची जबाबदारी ही त्यांच्या पत्नीवर आली असून त्यांच्या घरची परिस्थिती हालाखीची असल्या कारणामुळे मुलींच्या शिक्षणाचे काय?असा प्रश्न निर्माण झाला असता सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समाधान देशमुख यांनी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी सदरील मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले असून त्यांनी याद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखे अभिवादन



केले आहे.

यावेळी मराठा सेवा संघाचे सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष अॅड.राजेंद्र ठोसरे,जिजाऊ ब्रिगेडच्या ज्योतीताई जाधव, सर्वज्ञा हॉस्पिटलचे संचालक डॉ. बालाजी कळकुंबे, प्रा. निलेश बंगाळे,माँ जिजाऊ महिला अर्बनच्या अध्यक्षा प्रा. मंदाकिनी बंगाळे निलेश राठोड आदी उपस्थित होते.

# डॉ.शेख आवेज अहेमद एम.बी.बी.एस.परिक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील रहिवासी शेख अहेमद महंमद(शिक्षक, प्रगती विद्यालय बालेपीर बीड)यांचे चिरंजीव डॉ.शेख आवेज अहेमद हे नुकत्याच मेडिकल महाविद्यालयचे लागलेल्या निकालात एम.बी.बी.एस. मध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. शेख आवेज यांनी नेटच्या परिक्षेत राज्यात १४ वा क्रमांक येवुन एम.बी.बी. एस.बी टी वैद्यकीय महाविद्यालय तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथून उत्तीर्ण झाले तसेच डॉ.शेख आवेज यांचे प्राथमिक शिक्षण



प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथे झाले. त्यांचा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला या वेळी दैनिक पार्श्वभूमीचे जेष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अ.कादर मकराणी(चाऊस), दै.झुंजारनेता प्रतिनिधी विजय जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे तालुका सचिव तथा दै.लोकमत तालुका प्रतिनिधी अजय जोशी, दैनिक प्रजापत्र पाटोदा प्रतिनिधी सय्यद रियाज, साप्ताहिक शिवसंकेत संपादक प्रा.सचिन गायकवाड, मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मिडिया तालुकाध्यक्ष तथा दै.दिव्य वार्ता पाटोदा तालुका प्रतिनिधी जावेद शेख, मासिक सावता दिप चे संपादक डिंगबर नाईकनवरे, मराठी पत्रकार परिषद शहराध्यक्ष हमीदखान पठाण सह इतर उपस्थित होते.

# वाघिरे महाविद्यालयात माहात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**



ओतूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ नंदकिशोर उगले यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले अशी माहिती प्राचार्य डॉ महेंद्र अवघडे व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल बिबे यांनी दिली.

सदर कार्यक्रमांमध्ये आपल्या व्याख्यानामध्ये डॉ. उगले यांनी आपल्या मनोगतात महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेत असतानाच महात्मा ज्योतिबा फुले हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे आदर्श होते असे नमूद केले. तसेच या दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्य नुसार जोपर्यंत जातीव्यवस्था संपुष्टात येत नाही तोपर्यंत सामाजिक ऐक्य निर्माण होणार नाही असे मत व्यक्त केले, त्यासाठी सर्वांनीच स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय या चतुसूत्री चा अवलंब केला पाहिजे. याचबरोबर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सर्वच महापुरुषांच्या जीवनावरील आधारित साहित्याचे वाचन करून आपले जीवन समृद्ध करावे असे आवाहन केले.सदर कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका सायली अहिनवे विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ आर एन शिरसाट, डॉ के डी सोनावणे, डॉ एस एस लंगडे, प्रा. जे ऐ शेटे आदी मान्यवर व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ निलेश काळे, डॉ दत्तात्रय टिळेकर व डॉ रमाकांत कसपटे यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अमोल बिबे यांनी केले. सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मनोज गायकर याने तर आभार प्रदर्शन डॉ अनिल लोंढे यांनी व्यक्त केले.

# श्री स्वामी समर्थ प्रकट दिन निमित्त केडगावात मिरवणूक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**



श्री स्वामी समर्थ प्रकट दिन निमित्त केडगाव परिसरातून भक्तीमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये भाविकांसह महिला वर्ग मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. स्वामी समर्थ मित्र मंडळ आणि महिला सेवेकरी परिवाराच्यावतीने गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर केडगावच्या बालाजी कॉलनीत तीन दिवसीय विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

भजन संध्या, अक्षय मुडावदकर यांचे व्याख्यान आणि परिसरातून पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरची मिरवणुकीचे स्वामी समर्थ चौकातून प्रारंभ झाले. बालाजी कॉलनी, अंबिकानगर आदी परिसरातून निघालेली मिरवणुक पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. भाविकांनी मिरवणुकीतील पालखीचे दर्शन घेतले. केडगाव वेस येथे महिलांनी रिंगण सोहळा करुन स्वामी समर्थ महाराजांचा जयघोष केला.नेप्ती रोड मार्गे मिरवणुक पुन्हा बालाजी कॉलनीतून स्वामी समर्थ चौक या ठिकाणी पोहचल्यानंतर भक्ती गीतांवर भाविकांनी ठेका धरला होता. तर महिलांनी फुगडी खेळल्या. मिरवणुकीच्या समारोपनंतर श्री स्वामी समर्थ यांची आरती करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तीन दिवस चाललेल्या कार्यक्रमाची भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली.

# गारपीट नुकसान ग्रस्त शेतकर्यांना तात्काळ अनुदान द्यावे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**



तालुक्यातील मौजे नाव्होली येथील रहिवाशी श्री. सी बी एस ईनामदार किसान सेल चे बीड जिल्हाअध्यक्ष (शरद चंद्रजी पवार साहेब पक्ष)हे नेहमी शेतकर्याची आस्था मांडताना दिसतात .कधी शेतकर्यांना शासन निर्णयाप्रमाणे अनुदान देण्यासाठी तर शेतमालाला ठोक भाव मिळण्याठी आंदोलन व उपोषण या मार्गाचा अवलंब करुन शेतकर्याची बाजु शासन दरबारी लावुन धरणारा व्यक्ती आज दि.१४/४/२०२४ रोजी

वडवणी तालुक्यात आपत्तीग्रस्त तालुका म्हणून गारपीट झालेले ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन चौकशी केली व नुस्कान ग्रस्त शेतकर्याशी संवाद साधला असता दि.१० ते १२ तारखेपर्यंत वारे वादळ वाहुन त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे अतोनातून नुकसान झाले आहे शेतकऱ्याचे शेतातील घर त्यावरील पत्रे संपूर्ण उडालेले आहेत व शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर आहे हे समोर दिसले शेतकऱ्यांचे आज रोजी उभे असलेली पिके ऊस, बाजरी ,बागायत टरबूज व बागायत मिरची इत्यादी फळबाग यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. प्रत्यक्ष मौजे चिंचवन ,पारगाव, थेटेगव्हाण ,खडकी देवळा ,पिंपळ टाका, चौंडी या गावाला भेट दिली ही माहिती तहसीलदार वडवणी यांना दूरध्वनी वरून ही माहिती देण्यात आली अणि विनंती केली की तलाठी मंडळ अधिकारी साहेब यांना तात्काळ घटनास्थळी पाठवावे व पंचनामा करून अहवाल जिल्हाधिकारी साहेब यांना सादर करावा अशी मागणी केली या वेळी श्री.कैलास चाळक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार युवक तालुका अध्यक्ष केज, शेख अहमद, देशमुख आदिसह शेतकरी उपस्थीत होते .

# राजेगांव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**



तालुक्यातील मौजे राजेगांव येथे ग्रामपंचायत कार्यालय व अंगणवाडी क्र १, आणि२ येथे महामानव ,परमपुज्य,भारतरत्न प्रतिमेला पुष्पहार सरपंच सौ.सुशिला अविनाश मस्के यांच्या हस्ते अर्पण करुन भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी करण्यात आली.१४ एप्रील १८९१ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म मध्यप्रदेशातील महु या गावी झाला .खडतर प्रसंग झेलत जीवन संघर्षमय जगले आणि किर्ती आमर करून ०६ डिसेंबर १९५६ साली आनंतात विलीन झाले. शिका संघटीत व्हा संघर्ष करा हा त्रिसुत्री मुलमंत्र बाबासाहेबांनी सर्वांना दिला .जनसामान्यांच्या आन्यायाला वाचा फोडण्यासाठी नेहमी प्रयत्न करत होते.अस्प्रश्य समजल्या जाणार्या समाजावर अविरत आन्याय होत आहेत हे बाबासाहेबांना लक्षात आले तर त्यांनी बातमी प्रसारित करण्यासाठी मटर व तीन रु फीस लोकमान्य टिळकाकडे देऊन ही बातमी प्रसारित केली नाही. ही खंत बाबासाहेबांच्या मनाला लागली अणि आरक्षणाचे जनक श्री .राजर्षी शाहु महाराज यांच्या मदतीने 'मुकनायक' हे पाक्षीक सुरूवात केलं तेव्हा झाले भिमराव मुकनायक हे प्रसिध्द गित झाले .आशा ज्ञानाच्या आथांग सागरास अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंच सौ.सुशिला अविनाश मस्के,ग्रामपंचायत सदस्या सौ. मंगल विलास सोनवणे ,प्रतिष्ठीत नागरीक श्री.पद्माकर वसंत मेटे,ग्रामपंचायत आपरेटर श्री.राहुल विनायक मेटे ,तानाजी मेटे अंगणवाडी शिक्षीका पुष्पा मडम,बिस्मीला मडम ,मदतनिस रमल जाधव,कोमल जाधव ,ग्रामपंचायत सेवक श्री.अभिमान सोनवणे आदिसह सर्वजण उपस्थीत होते.

# आष्टीचे गटविकास अधिकारी राजेंद्र गर्जे यांची चौकशी करा-कैलास दरेकर

## दुष्काळात होरपळणा-या शेतक-यांकडून १५ हजार घेऊन दिला वैयक्तिक लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



आष्टी-दुष्काळी परिस्थितीत होरपळणा-या शेतक-यांची रोजीरोटीसाठी धडपड सुरू असताना संधीचा फायदा घेत १० ते १५ हजार रुपयांची मागणी करून महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेतील वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ मिळवून देणा-या गटविकास अधिकारी राजेंद्र गर्जे यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी कैलास दरेकर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे आज (दि. १२) केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, आष्टी तालुक्यातील कायम दुष्काळी परिस्थितीशी मुकाबला करणारा शेतकरी वर्ग ठोस उत्पन्न हाती यावे यासाठी मग्रारोहयोमार्फत मिळणार्या कामांमधून स्वउन्नती साधण्यासाठी येथील पंचायत समितीत लाभ मिळण्यासाठी हेलपाटे मारीत असतो. हीच संधी साधत येथील पंचायत समितीतील रोजगार हमी योजनेअंतर्गत येणार्या वैयक्तिक लाभाच्या महोगणी वृक्ष लागवड, शेततळे, गायगोठा, जलसिंचन विहीरीस अनेक योजनांमध्ये लाभ मिळवून देण्यासाठी शेतकर्यांना गंडविण्याचे प्रकार करण्यात आलेले आहेत.

संधीचा फायदा घेत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील शेतकर्यांसाठी वैयक्तिक लाभाचे महोगणी वृक्ष लागवड, शेततळे, गायगोठा, जलसिंचन विहीर या योजनेच्या कामाच्या अंमलबजावणीकडे आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री.राजेंद्र गर्जे यांनी कंत्राटी स्वरुपात कार्यरत असलेल्या कर्मचार्यांशी संधान साधून मोठ्या प्रमाणावर आर्थिक भ्रष्टाचार केला आहे.

वैयक्तिक लाभाच्या महोनणी वृक्ष लागवड - ५००, शेततळे - १५००, जलसिंचन विहिरी - ३००० या प्रमाणात मंजुरी देण्यात आलेली आहे. प्रशासकीय मंजुरीसाठी गटविकास अधिकारी श्री. राजेंद्र गर्जे यांनी शेतकर्यांकडून प्रत्येकी १० ते १५ हजारांची रक्कम उकळली आहे. श्री. गर्जे यांनी अंदाजे सुमारे ३ ते ४ कोटी रुपयांची माया या माध्यमातून जमविल्याचा आरोप शेतकर्यांमधून होत आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी कैलास दरेकर यांनी शुक्रवारी (दि. १२) जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

### घेतलेले पैसे परत करा

दरम्यान, शेतक-यांवर आलेल्या आपत्तीचे इष्टापत्तीत रुपांतर करून त्यांच्या खिशावर डल्ला मारत येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र गर्जे यांनी मोठी आर्थिक अपसंपदा जमा केली आहे. या प्रकाराची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी करून यात तथ्य आढळून आल्यास शेतक-यांकडून लुबाडणूक करून घेण्यात आलेले पैसे शेतक-यांना परत करावेत, अशी मागणीही श्री. दरेकर यांनी निवेदनात केली आहे.

# बौद्ध वासी अशोक बाळू सदाफुले यांच्या स्मरणार्थ सदाफुले परिवाराकडून

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तके भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त

बौद्ध वासी अशोक बाळू सदाफुले यांच्या स्मरणार्थ सदाफुले परिवाराकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय भीम नगर आष्टी या वाचनालयास भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावरील पुस्तके भेट देण्यात आली.यावेळी माजी सरपंच अरुण भैय्या निकाळजे, माजी नगरसेवक दिपक निकाळजे,व्यापारी संघटनेचे संजय शेठ मेहेर,कमलेश शेठ पटवा,कॉषाध्यक्ष राजू निकाळजे,आकाश निकाळजे, कमल अशोक सदाफुले,विपुल अशोक सदाफुले,विवेक अशोक सदाफुले

# रविकांत तुपकर यांच्या प्रचाराला लोणार तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । प्रतिनिधी**

रविकांत तुपकर यांचा जिल्हाभरात सुरू असलेल्या प्रचाराचा झंझावात काल (ता.१३ एप्रिल) लोणार आणि तालुक्यात सर्वत्र गाजला. दुपारी लोणार आणि तालुक्यातील सुलतानपूर येथे उन्हा-तान्हात जोरदार सभा झाली, तर मेहकर तालुक्यातील जानेफळ, डोणगाव व बेलगाव येथील रविकांत तुपकरांच्या सभांना नागरिकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती.

जनतेचा एकच बाणा, निवडून आणा पाना या घोषणेने प्रचाराचा कालचा दिवस दणाणून सोडला. घरची चटणी-भाकर खाऊन लोकं गावगाड्यातून या सभांना हजेरी लावत होते. सर्वत्र रविकांत तुपकरांना जनतेचा मोठा पाठींबा मिळत आहे. तुम्ही लढा, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, असा विश्वास नागरिक व्यक्त करत होते. रविकांत तुपकरांच्या प्रचाराला मिळणारा प्रतिसाद हीच जिल्ह्यातील परिवर्तनाची नांदी आहे असं मत जनसामान्य व्यक्त करीत आहेत.

# पाटोदा येथे विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती निमित्त अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**




पाटोदा येथे विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी ठिक ९:०० वाजता भिमनगर येथे विधान परिषद सदस्य आमदार सुरेश आण्णा धस यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, जेष्ठ समाजसेवक दलित मित्र एकबाल पेंटर, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, बीड जिल्हा परिषद माजी सभापती महेंद्र गर्जे, नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव, गटनेते बळीराम पोटे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक नय्युम पठाण, अँड जब्बार पठाण, सय्यद शहानवाज, नगरसेवक रामेश्वर गोरे, न.प.सभापती हनुमंत काळे, किशोर अडागळे, बाळासाहेब जावळे, रिपाई तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे, सेवा सोसायटी संचालक सय्यद सज्जाद, भगवान जावळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर, पाटोदा नगर पंचायतचे उपनगराध्यक्ष, सभापती, नगरसेवक व शेकडो भिम सैनिकासह नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त आष्टी येथे सच्च्या कार्यकर्ताचा सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त तालुका आष्टी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसेच दरवर्षीप्रमाणे जयंती महोत्सव समितीतर्फे दिवंगत रघुनाथ बंधू निकाळजे सामाजिक स्मृतीस पुरस्काराचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात आले यावर्षीचा हा पुरस्कार आंबेडकरी चळवळीतील तळमळीचे कार्यकर्ते पंचायत समिती आष्टीचे माजी उपसभापती अरुण भैय्या निकाळजे यांना देण्यात आला अरुण भैय्या निकाळजे यांनी सन १९८२ पासून दलीत आंबेडकरी चळवळीस सुरुवात केली,याच साली पँथर सारख्या आक्रमक संघटनेची स्थापना केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात स्थापन केली,दलित चळवळीच्या माध्यमातून गायरान चळवळ विद्यापीठ नामांतर चळवळ तालुक्यातील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केले चळवळीच्या माध्यमातून अनेक कार्यकर्ते घडवले आंबेडकरी विचार तळागाळापर्यंत पोचण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पँथर संघटना विसर्जित झाल्यानंतर रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आष्टी तालुका उपाध्यक्ष म्हणून या राजकीय संघटनेत काम सुरू केले चळवळी बरोबरच पंचायत समिती आष्टीचे उपसभापती पद आष्टी शहराचे सरपंच पद कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पद कडा साखर कारखान्याचे संचालक पद अशा विविध पदावर काम करण्याची संधी मिळाली विद्यापीठ नामांतर चळवळीचा आंदोलनामध्ये व पँथर चळवळीने दरम्यान त्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल झाले अशा प्रामाणिक सच्चा कार्यकर्त्यास आज जयंती महोत्सव समिती आष्टीच्या वतीने आमदार बाळासाहेब आजबे माननीय आमदार भीमराव धोंडे माननीय आमदार साहेबराव दरेकर युवा नेते जयदत्त भैय्या सतीश आबा शिंदे तसेच जयंती महोत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी यांच्यातर्फे प्रदान करण्यात आला यावेळी वाल्मिक तात्या निकाळजे,अशोकराव साळवे ड रत्नदीप निकाळजे, सरपंच प्रविण गायकवाड,रुपेश निकाळजे,माजी नगरसेवक दिपक निकाळजे,माजी नगरसेवक सादिक कुरेशी राजू निकाळजे नामदेव राऊत आष्टीचे तहसीलदार श्री प्रमोद गायकवाड साहेब,आष्टीचे पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळ साहेब,पत्रकार सचिन रानडे,पत्रकार गणेश दळवी,पत्रकार अण्णासाहेब साबळे,जयंती कमिटीचे अध्यक्ष अशोक निकाळजे डॉक्टर युवराज तुपेरे कुणाल निकाळजे,सनी काळपुंड सुनील शिंदे सर सचिन निकाळजे सर प्रदीप पगारे, मिलिंद निकाळजे,शशिकांत निकाळजे,योगेश तुपेरे आदींसह हजारो नागरिक व्यापारी सर्व क्षेत्रातील विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते हा पुरस्कार मिळाल्यामुळे माननीय श्री अरुण भैय्या निकाळजे यांचे सर्व क्षेत्रातून हार्दिक अभिनंदन होत आहे आणि अजूनही शुभेच्छाचा वर्षाव होताना दिसत आहे.

# मा.दिपकभाऊ निकाळजे यांनी दिला शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या उमेदवाराला दिला पांठिबा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

महागाई,बेरोजगारी,सरकारी संस्थांचे खाजगीकरण यामुळे आरक्षण द्वारे अनुसूचित जाती जमातींना मिळणाऱ्या नोकऱ्या जवळपास संपुष्टात आल्या आहेत.लष्करी जवानांसाठीची देश व तरूणांच्या दृष्टीने घातक अग्निवीर योजना,शेतकरी आंदोलन व त्यांच्या न्याय मागण्यांबाबत सरकारचे दडपशाहीचे धोरण,कोरोना महामारीनंतरही सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची दुरवस्था.... एक ना अनेक कारणे आहेत ज्यामुळे केंद्रीय पातळीवर सत्ता बदल करणे,ही देशाची, संविधानाची गरज.त्यासाठीच आपल्या पक्षाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला येत्या लोकसभा निवडणुकांमध्ये रिपाई(ए) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा दिपकभाऊ निकाळजे यांने पक्षाच्या वतिने पाठिंबा दिला आहे.अशी माहिती महाराष्ट्र राज्य कार्यध्यक्ष मा.बाळासाहेब पवार यांनी दिली.

# उमेदवार बजरंग बप्पा सोनवणेंची सजविलेल्या बैलगाडीतून हरी ना.आष्टा येथील गावकऱ्यांनी मिरवणूक काढून केले जंगी स्वागत

## तालुक्यातील विविध गावात कॉर्नर बैठका घेत साधला मतदार राजाचा संवाद!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी तालुक्यातील हरी नारायण आष्टा येथे राष्ट्रवादी काँग्रेस व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गाठीभेटीसाठी गेले असता गावकऱ्यांनी सजविलेल्या बैलगाडीतून वाजत - गाजत गावातून मिरवणूक काढून त्यांचे जंगी स्वागत केले.बीड लोकसभा निवडणुकीचे राष्ट्रवादी काँग्रेस,इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे प्रचारनिमित्त शुक्रवारी आष्टी तालुक्यात दौऱ्यावर होते.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,किशोर हंबर्डे, विधानसभा प्रमुख रामभाऊ खाडे,परमेश्वर शेळके,आपचे डॉ.नाथ,काँग्रेसचे रविदादा ढोबळे,सचिन वारूळे यांचीप्रमुख उपस्थिती होती.आष्टी तालुक्यातील हरीनारायण आष्टा येथे बजरंग सोनवणे यांचे आगमन होताच गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे त्यांची सजवलेल्या बैलगाडीतून ढोलताशाच्या गजरात वाजत - गाजत व फटाक्यांची आतिषबाजी करीत गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी रस्त्यात उभ्या असलेल्या महिलांनी त्यांचे औक्षण करूनत्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा भेट दिली.

उमेदवार बजरंग सोनवणे यांनी शुक्रवारी सकाळ पासूनच तालुक्यातील चिंचपुर (रे),डोके वस्ती,मातावळी,आष्टा फाटा, जामगाव वस्ती,जामगाव,वाळूज टाकळसिंग,चिखली,वाकी,शिराळ, कानडी(बु),धीर्डी,निमगाव चोभा,काटवन वस्ती, रुईनालकोल,फत्तेवडगाव,पिंपरी (घु.) येथे भेटी देऊन मतदार राजा शी संवाद साधत कॉर्नर बैठका घेतल्या.

# सेवानिवृत्त अभियंता इनायततुल्ला बेग हे उमराह यात्रेवरून परतल्यानंतर आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



आष्टी नगरपंचायतचे नगराध्यक्ष जिया बेग यांचे वडील माजी सेवानिवृत्त जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता इनायततुल्ला बेग यांनी नुकतीच बेग परिवारासोबत सौदी अरेबियातील मक्का येथील उमराह यात्रा पूर्ण केल्याबद्दल आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने त्यांचे अभिनंदन करत सत्कार केला होते.

सौदी अरेबियातील मक्का येथे वार्षिक हज यात्रेवैतिरिक वर्षभरात पवित्र काबाचे दर्शन घेण्यासाठी उमराह यात्रेनिमित्त अनेक मुस्लिम बांधव जगभरासह देशांमधून यात्रेकरू दरवर्षी मक्का येथे जात असतात. इस्लाम धर्माच्या पाच तत्त्वांपैकी हज यात्रा एक तत्त्व आहे.शारीरिक आणि आर्थिकरीत्या सक्षम असणाऱ्या मुस्लिमांनी आयुष्यात एकदा तरी हज यात्रा केली पाहिजे, असे सांगितले जाते. जीवनात कळत-नकळत झालेले पाप धुऊन टाकणारा आणि अल्लाहच्या नजीक नेणारा एक आध्यात्मिक अनुभव म्हणून हज यात्रेबरोबर उमराह यात्राकडे पाहिले जाते.मुस्लिम धर्मीयांच्या एकतेचे प्रतीक म्हणूनही याकडे पाहिले जाते.आष्टी शहरातील माजी सेवानिवृत्त जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता इनायततुल्ला बेग,पत्नी आयशा बेग,मुलगा डॉ.सिद्दीक बेग आणि परिवारातील पाच सदस्यांनी काबाचे दर्शन घेत मक्का मशिदी पंधरा दिवस नमाज पठण करत दुवा मागितली.ही यात्रा मुस्लिम बांधवांसाठी पवित्र असल्याकारणाने येथून येणाऱ्या भाविकांचे स्वागत केले जाते याचेच औचित्य साधून आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने इंजि.इनायततुल्ला बेग यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रफुल भाऊ सहस्रबुद्धे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सेवानिवृत्त शॉप निरीक्षक मजहर बेग, नगराध्यक्ष जिया भाई बेग, इंजि.अत्तहर बेग, डॉ.सिद्दीक बेग,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे, उपाध्यक्ष संतोष सानप,पत्रकार गणेश दळवी, पत्रकार सचिन रानडे, शिक्षक राजेंद्र लाड आदी उपस्थित होते.

# एका बेवारस गाईला दिले जीवदान..!

## डॉ.गदादे यांचा उपक्रम;इतर बांधवांनीही या अनोख्या उपक्रमांचा घ्यावा आदर्श !

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



सध्या उन्हाची तीव्रता खूप जास्त प्रमाणात आहे.आशा परिस्थितीत जनावरांना पाण्याची आणि चाऱ्याची कमतरता भासत आहे. जनावरांमध्ये अशक्तपणा दिसून येतो,जनावर आजाराला बळी पडत आहे.ही परिस्थिती शहरातील फिरस्त्या भटकत्या जनावरांमध्ये जास्त प्रमाणात दिसून येते.हा प्रकार आज आष्टी मध्ये भटकणाऱ्या गाईमध्ये दिसून आला.रस्त्याच्या कडेला गाय आडवी पडलेले असताना दिसून आली.उष्णतेमुळे गायीला उष्माघाताचा त्रास झाल्याचे दिसून आले.हे दृश्य सकाळी फिरायला जात असताना डॉक्टर सुनील गदादे यांच्या लक्षात आले.त्यानंतर त्यांनी लगेचच गाईवर उपचार करून तिला बरी केले.यावेळी मदतीसाठी

सरपंच गणेश गर्जे,नारायण बनसोडे सर,डॉ.पाडूरंग गरसुळे, राजू काका गोल्हार,पत्रकार अण्णासाहेब साबळे,वारगुळे सुनील,निखिल ढंगे,अक्षय लटपटे,डॉ.प्रकाश झांजे,श्याम धनवडे,रूक्षीकेश गोल्हार,गणेश भवर,रामदास भवर अजित कोंडे आदी उपस्थित होते.यासाठी पशुपालकांना विनंती करण्यात येते की या उन्हामध्ये जनावरांना भरपूर पाणी आणि चारा देण्यात यावा.जनावरांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी सावली ची व्यवस्था करावी दिवसातून दोन ते तीन वेळा अंगावर पाणी टाकावे...एका बेवारस गाईला दिले जीवदान..! डॉ.गदादे यांचा असा हा उपक्रम..!

# प्रा.नरेंद्र खेडेकर यांच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । प्रतिनिधी**

लोणार महाविकास इंडिया आघाडीचे उमेदवार प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्या प्रचारास ग्रामीण भागातील मतदार राजा कडून उत्स्पुर्त प्रतिसाद मिळत आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आम आदमी पार्टी व मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रा. नरेंद्र दगडू खेडेकर यांच्या प्रचारार्थ लोणार तालुक्यातील ग्रामीण भागातील मतदार राजा यांच्या कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे लोणार तालुक्यातील पिंपळनेर, जांभूल, देऊळगाव वायसा, सोनूना, गोत्रा, शिवनी जाट, गांधारी, सावरगाव मुंढे, रायगाव, नांद्रा, धाड, टिटवी, पांगरा डोळे, कुंडलस, त्याचबरोबर अजिस्पूर, खुरमपूर, देऊळगाव कुंडपाळ, चिंचोली सांगळे, पारडा,येवती, कसारी, वझर आघाव, किन्ही, धायफळ, बिबखेडा येथे मोठ्या संख्येने मिरवणुका निघून त्याचे रूपांतर सभेमध्ये झाले या सभेत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजेश मापारी शहराध्यक्ष शेख समद, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सदानंद पाटील तेजनकर, शहराध्यक्ष वाजिद खान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे तालुकाप्रमुख एड दीपक मापारी शहर प्रमुख गजानन जाधव सुदन अंभोरे यांची प्रामुख्याने भाषणे झाली याप्रसंगी,काँग्रेसचे भूषण मपारी, विठ्ठलराव नागरे, ज्ञानेश्वर चिभडे मामा, विजय मोरे, टेजराव घायाळ, सतीश राठोड, परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, वाजिद खान, तौफिक कुरेशी, प्रदीप संचेती, विकस मोरे, अंबादास इंगळे, जीवन घायाळ, राजूभाऊ बुधवत, इक्बाल कुरेशी, लूकमान कुरेशी, समाधान ठाकरे, निलेश चव्हाण, श्रीकांत मदनकर अश्रुबा धारकर छगन काळे आम आदी पक्षाचे आम आदमी पार्टीचे अशोक जाधव, उमर सय्यद, गणेश सोळंके, विशाल, चव्हाण, दत्ता डाखोरे, गोपाल खोतकर, तानाजी अंभोरे, तानाजी मापारी, राजू दहातोंडे किरण कमडे, सोमेश गुत्ते, गणेश पाठे, प्रसेनजित बशिरे, जयकुमार जारे, यांच्यासह मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

# उमेदवारांनी समाज माध्यमांच्या जाहिरातींचे पूर्व-प्रमाणीकरण करणे आवश्यक-जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १५-हिंगोली लोकसभा मतदार संघातील उमेदवारांनी त्यांच्या समाज माध्यमांवर प्रसारीत करावयाच्या जाहिरातींच्या मजकूर, व्हीडिओ, ऑडिओ आदी प्रकारचे जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणीकरण करून घेणे अनिवार्य असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सांगितले आहे.

नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांनी सोबतच्या जोडलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद समाज माध्यमांच्या खात्यावर जाहिराती करण्यापूर्वी त्यांचे प्रमाणीकरण करून घ्यावे. वृत्तपत्र आणि वृत्त वाहिन्यांप्रमाणेच समाज माध्यमे, संकेतस्थळांवर करण्यात येणाऱ्या मजकूर, ऑडिओ-व्हिडीओ पूर्व प्रमाणकाच्या कक्षेत येतात. त्यामुळे त्यांचे पूर्व प्रमाणीकरण करून घ्यावे. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी कोणत्याही इंटरनेट आधारित प्रसारमाध्यम, समाज माध्यम किंवा संकेतस्थळावर त्याच नमुन्यात निर्दिष्ट केलेल्या त्याच कार्यपद्धतीचे अनुकरण करून जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून पूर्व प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन श्री. पापळकर यांनी केले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ याच्या कलम ७७, पोटकलम (१) अनुसार प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीच्या संबंधात त्यांच्याकडून किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती नामनिर्देशन दाखल केल्याचा दिनांक व निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याचा दिनांक यांत दोन्ही दिनांकाचा समावेश असून, झालेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशोब ठेवणे आवश्यक आहे. सामाजिक प्रसारमाध्यमातील कोणत्याही जाहिरातीद्वारे निवडणूक मोहिमेवरील खर्च हा निवडणुकांच्या संबंधातील सर्व खर्चाचा एक भाग असल्याचे त्यांनी कळविले आहे. उमेदवार व राजकीय पक्ष हे अचूक हिशोब ठेवण्यासंबधी आणि खर्चाचे विवरणपत्र सादर करण्यासंबंधीचा तसेच प्रचार करण्याबाबतच्या सर्व खर्चाचा समावेश करतील. यात सामाजिक प्रसारमाध्यमावरील जाहिरातीवर झालेल्या खर्चाचा देखील समावेश आहे. इतर बाबींसहित यामध्ये जाहिरात प्रसिद्धी करण्यासाठी इंटरनेट कंपन्या व वेबसाईट यांना केलेल्या प्रदानांचा आणि तसेच प्रचाराशी संबंधित कार्यात्मक खर्च, सृजनशील मजकूर विकसित करण्यावर झालेला कार्यात्मक व्यवहार खर्च, वेतनांवरील व्यवहार खर्च आणि उमेदवार, राजकीय पक्षांकडून त्यांचा सामाजिक प्रसारमाध्यम खाते सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यावरील पथकरात प्रदान केलेल्या मजुरीचा देखील समावेश असेल, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पापळकर यांनी सांगितले आहे.

# सामान्य माणसाचे पाठबळ मोदीजींच्या पाठीशीच-खा.डॉ.सुजय विखे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राज्यात महायुतीचे ४५ हुन अधिक जागांवर मोठ्या मताधिक्याने विजयी होणार आहेत. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीत अद्यापही जागा वाटपावरुन वाद सुरू आहेत. विकासाच्या मुद्यावर तिस-यांदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी सामान्य माणूस महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार राहील असा विश्वास खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील माळी बाभूळगाव येथील मेरा बुथ सबसे मजबूत या कार्यक्रमात खा.विखे पाटील बोलत होते. अहिल्यानगर मधील लोकसभेच्या प्रचाराला आता रंग चढत चालला आहे. मेरा बुथ सबसे मजबूत कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बुथ प्रमुखांशी त्यांनी संवाद साथला. याप्रसंगी आ.मोनीकाताई राजळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ.सुजय विखे पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, राज्यात केवळ महायुतीच्याच उमेदवाराला लोकांची पसंती मिळणार असून राज्यात ४५ हुन अधिक जागेवर मोठ्या मताधिक्याने कार्यक्रत्यांच्या जोरावर आपले उमेदवार निवडून येणार आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रुपाने देशाला पुन्हा एकदा सक्षम आणि कतृत्ववान पंतप्रधान मिळणार आहे. त्यात महाराष्ट्राचा मोठा वाटा असणार असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

डॉ.सुजय विखे म्हणाले महाविकास आघाडीच्या नेत्यांकडे विकासाचे कोणतेही धोरण नाही, देशाचा पंतप्रधान कोण? यांचा चेहरा नाही. आणि त्यांच्यातील वादच हे त्यांच्या नष्ट होण्याचे कारण असणार आहे. त्याच प्रमाणे येत्या ४ जूनला राज्यातील महाविकास आघाडी आणि देशातील इंडी आघाडीचा जनता दारुण पराभव करेल. कार्यकर्त्यांनी विरोधकांचा विचार न करता केवळ देशाचे पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या विकास कामांची माहिती घरोघरी पोहचविण्याचे आवाहन त्यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना केले.

# निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी दक्ष रहा-सहायक निवडणूक अधिकारी डॉ.सखाराम मुळे

## उमरखेड येथे टपाली मतदान अधिकारी-कर्मचारी यांचा आढावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा मतदार संघातील उमरखेड विधानसभा मतदार संघासाठी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी उपविभागीय कार्यालयात टपाली मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आढावा घेतला. यावेळी तहसीलदार आर.यु.सुरडकर, नायब तहसीलदार कावरे उपस्थित होते. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने लोकसभा मतदार संघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततेत व पारदर्शकपणे पार पाडावी. यासाठी नेमण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर न ठेवता दक्ष राहण्याचे आवाहन सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सखाराम मुळे यांनी केले.

१५-हिंगोली लोकसभा मतदार संघात ८२-उमरखेड विधानसभा मतदार संघ समाविष्ट आहे. उमरखेड तहसील कार्यालय येथील सभागृहामध्ये टपाली मतदानाशी संबंधितांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. निवडणूक आयोगाने आवश्यक गोष्टीची पूर्ण पूर्तता करण्यास अधिन राहून टपाली मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

इडीसी व टपाली मतदान

टपाली मतदानासाठी नमुना फॉर्म १२ ए विहित कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत विधानसभा मतदारसंघ क्रमांक, मतदार यादी, भाग क्रमांक, मतदार यादीतील क्रमांक, तसेच नेमणूक आदेश, निवडणूक ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्ज सादर करणे तसेच अर्जात काही दुरुस्ती असल्यास ती पूर्ण करणे ही प्रक्रिया उमेदवारी माघार



घेण्याच्या दिनांकापूर्वी पूर्ण होणे आवश्यक राहील. फॉर्म नंबर १३ ए, १३ बी, १३ सी, १३ डी, आणि पोस्टल मतदान घोषणा पत्र आणि ओळखीचा पुरावा आणि मतदान नोंदवहीचा पुरावा, ओळखपत्र असणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये अनुक्रमांक, नाव, यादी क्रमांक व्यवस्थित टाकावा. इडीसी व टपाली मतदानासाठी एकूण १९३ लोकांचे मतदान आहे. नमुना १३ ए मधील घोषणापत्र भरून त्यावर स्वाक्षरी करावी. उपस्थित राजपत्रित अधिकारी मतदाराचे ओळखपत्र तसेच टपालीमधील पत्रिका क्रमांक नमुना १३ ए मध्ये नोंदविला आहे, याची खात्री करून घोषणापत्र साक्षांकित करतील. मतदार हा मतदान कक्षात जाऊन नमुना १३ बीच्या आतील लिफाफ्यावर मतपत्रिका क्रमांक नमूद करेल व आपल्या पसंतीच्या उमेदवारासमोर खूण करून गोपनीयरीत्या मतदान करतील.

मतदान केलेली मतपत्रिका नमुना १३ ए यातील लिफाफ्यावर टाकून सीलबंद करा, नमुना १३ए मधील घोषणापत्र व मतपत्रिका असलेल्या नमुना १३ बी हे दोघांना मोठा लिफाफा नमुना १३ सीमध्ये ठेवून बाहेरील लिफाफा सीलबंद करावा. नमुना १३ सी लिफाफा सुविधा केंद्रावरील पेटीत टाकावा लागतो, असे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सखाराम मुळे यांनी सांगितले.



**भोकरदन पोलीस स्टेशनमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी भोकरदन पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षण बालाजी वैद्य साहेब, सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत काळे, पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत, पिंपळकर साहेब, आदींची उपस्थिती होती....छाया लोकनेता न्यूज नेटवर्क राम शिंदे**

## दानापूर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दानापूर समितीचे अध्यक्ष रतन राऊत, उपाध्यक्ष खंडू साळवे, सचिव भिकन बोर्डे, यावेळी गावातील उपस्थित नागरिक यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला यावेळी दानापूर गावचे सर्वप्रथम नागरिक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार बांधव, महिला मंडळ व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वीज-झाड पडून दोघांचा मृत्यू, ९ जनावरे ठार; फळबागांना फटका,

**लातूर**-दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने लातूर जिल्ह्यात जोरदार हजेरी लावली आहे. वादळी वारे, विजांचा कडकडाटासह पावसाचा मोठा फटका बसला आहे. शुक्रवारी रात्री व शनिवारी दिवसभरच्या पावसाने सुमारे ९५ हेक्टरवरील फळबांगाचे मोठे नुकसान झाले. जिल्ह्यात वादळी पावसाने दोन घटनात दोघांचा बळी गेला. पशुधन आणि शेतीची मोठ्या प्रमाणावर हानी झाली.वडजी, ता. औसा येथे वीज पडून वैशाली मुळे तर वाघोली येथे अंगावर झाड कोसळून आदिनाथ जाधव यांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात विविध ठिकाणी ९ जनावरे दगावली. वीज पडून जळकोट तालुक्यात कडब्याची गंज भस्मसात झाली. गुडी पाडव्या पासून अधून मधून जिल्ह्यात सर्वत्र अवकाळी बरसत आहे. गुरुवारी पहिल्या दिवशी पावसाचा जोरदार तडाखा बसला. शुक्रवारीही अवकाळीने जिल्ह्याला झोडपले. अशा वातावरणामुळे अनेक ठिकाणी जनजीवन प्रभावीत झाले.

## अवकाळी पावसाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या-दुगाने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

जिल्ह्यात अचानक झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असून पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी . रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष ,साहेबराव दुगाने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



शेतकऱ्यांच्या शेतात मध्ये टरबूज, खरबूज, आंबा, तंबाखू ,उन्हाळी पिकांचे अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आधीच शेतकरी दुष्काळाचा सामना करत असताना शासन व प्रशासन दुष्काळी उपाययोजना करण्यात कमी पडल्याचे दिसून येते अशा परिस्थितीत दुष्काळात तेरावा महिनाच की काय अशी परिस्थिती निर्माण झाली असून अवकाळी व गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या नुकसानीचे प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून शासनाकडे शेतकऱ्याच्या नुकसानीचा अहवाल पाठवावा अशी मागणी रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष साहेबराव दुगाने यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकातुन केली आहे. काल परवा झालेला अवकाळी पाऊस व गारपीट या मुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी साहेबराव दुगाने यांनी पक्षाच्या वतीने केली आहे.

## कु.दिशा,व धनराज विक्रम घंटे यांनी सह्याद्री इंग्लिश स्कूलमध्ये मिळवले घवघवीत यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

सह्याद्री इंग्लिश स्कूल लोहा येथे शाळेतर्फे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांपैकी दिशा विक्रम घंटे हिने इन आऊट लीड या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक पटकावले व लीड कॉन्फरन्स मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला व धनराज विक्रम घंटे याने मनी इन द बकेट या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला या दोन भावंडांचा शाळेतर्फे ट्रॉफी सर्टिफिकेट व नगदी रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच विद्या तुळशीराम जोरूळे टॉप



फिफ्टी मध्ये पारितोषिक मिळवले. तनुजा तुळशीराम जोरूळे सायन्स एक्झिबिशन मध्ये व गायत्री गीताराम डवरे आयएसओ गोल्ड मेडल या विद्यार्थ्यांनी सह्याद्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मध्ये घवघवीत यश संपादन करून शाळेचे व आपल्या शहराचे नाव उंचावले त्याबद्दल त्यांचा सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील माहोरा दीप भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेमध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी माहोरा गावचे प्रथम नागरिक तथा गावचे सरपंच गजानन भगवानराव लहाने, यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री एस के पांडे सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठे संख्येने उपस्थित होते.

## वाचन संस्कृती टिकून ठेवण्यासाठी व्याख्यानमाला आवश्यक-डॉ.माने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

हरीवरदा या प्रसिद्ध संत वाङ: मयाचे भाष्यकार संत कवी श्री उत्तमश्लोक महाराज यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने श्री उत्तमश्लोक मंडळ आणि वाचनालय उमरखेड च्या वतीने आज स्व. नागोराव बाबा एक बोटे स्मृती व्याख्यानाला ब्राह्मण समाज मंदिर उमरखेड येथे घेण्यात आली या कार्यक्रमाला अध्यक्ष स्थानिक अँड विलासराव देवसरकर तर सत्कारमूर्ती म्हणून डॉक्टर विजयराव माने, दिपाली पुसदेकर हे होते यावेळी उमरखेडचे भूमिपुत्र तथा कृषी संशोधक डॉ . विजयराव माने यांनी शेतकऱ्यांसाठी व या भागातील पैनगंगा नदी खोऱ्यातील माती , पाणी आणि वातावरण या तिन्ही चा मिश्र परिणाम होऊन उत्पादित होणाऱ्या उमरखेडी ज्वारी ची ब्रॅण्डिंग करून प्रसार केल्यामुळे श्री उत्तमश्लोक व मंडळ यांच्या वतीने त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला तसेच सुवर्ण पदक पटकावणारे विद्यार्थिनी दिपाली पुसदेकर हीचा सुद्धा सत्कार करण्यात आला आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ . विजयराव माने यांनी विविध बाबीवर प्रकाश टाकला सध्या नवीन पिढीत वाचन




संस्कृती कमी होत चालली त्यासाठी एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत कार्य पोहचवण्याचे काम स्व. नागोराव बाबा एकबोटे स्मृती व्याख्यानमाल्यात केल्या जात आहे आपण ज्या क्षेत्रात आहोत त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांचा संपूर्ण विकासासाठी काम करण्यासाठी भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानच्या वतीने विविध कार्य करीत असून शेतकऱ्यांसाठी त्यांची आर्थिक उन्नती होण्याच्या दृष्टिकोनातून उमरखेडी ज्वारीचे ब्रॅण्डिंग करून शेतकऱ्यांसाठी कमी खर्चात अधिक आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होण्यासाठी या ज्वारी ची मागणी बाजारात वाढविण्याचे प्रयत्न करता असल्याचे सांगितले, आजच्या स्पर्धेच्या युगात जीवनामध्ये ताण तणाव वाढत असताना मनुष्याला चांगला आहार आणि रोग प्रतिकार शक्ती निर्माण होण्या च्या अनुषंगाने व या दृष्टिकोनातू उमरखेडी ज्वारी हे ब्रँड बाजारात आणला आहे, गहू आहारात त्यातील ग्लूटेन मुळे पचन क्रिया व त्यानंतर उद्भवणाऱ्या विकारामुळे गव्हातील ग्लूटेन नावाचा घटक डिंका खाण्यासारखा चिकट असल्यामुळे पोटातील आतड्यांमध्ये बॅक्टेरिया व इतर जीवाणूंना प्रसार होण्यास मदत होते आणि त्यामुळे माणसाला विविध रोग जडतात. नवीन पिढीतील लोकांना ज्वारी चे खाद्य पदार्थ ची आवड निर्माण करणे गरजेचे आहे, शेती हे जगण्याचे आणि पोट भरण्याचे साधन राहिले नसून उत्पादनाचे साधन झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना योग्य बाजार भाव दिला तरच विषमुक्त अन्न निर्माण होऊ शकेल अन्यथा उत्पादन वाढीच्या शर्यती मध्ये अन्न धान्याची प्रत कमकुवत होईल. रब्बीहंगामात माती मधील कमी अद्रता असणाऱ्या जमिनी मध्ये हरभरा पीक चांगले उत्पादन येत नसल्यामुळे या जमिनीत ज्वारी चे पीक हे योग्य पर्याय शेतकऱ्यानं कडे आहे, रब्बीत हंगामात कमी पाऊसमान असल्यामुळे आणि या ज्वारीचे कणीस जमिनीकडे झुकते असल्यामुळे आत पावसाचे पाणी साठून न राहता ज्वारी दाण्यांचा देठ पण्या पासून छत्री प्रमाणे सौरक्षण होऊन ज्वारी काळी पडून प्रत खराब होणार नाही आणि या सोबतच या जमिनी कडे झुकते असलेल्या ज्वारी च्या कनसाला पक्षी सुद्धा जास्त प्रमाणात त्रास करणार नाही. या ज्वारी चा पेरा दिवसांन दिवस वाढत आहे व ज्वारी चा बाजारात खप वाढविण्यासाठी ज्वारी वर प्रक्रिया करून मूल्यवर्धन करण्याची गरज बचत गटांनी ओळखून पाककलेच्या माध्यमातून महिलांनी भाकरी, लाह्या, घुग्र्या, आंबील, पोहे, इडली व दोसा साठी पीठ, खीर, असे अनेक मूल्यवर्धन प्रॉडक्ट बाजारात अनलेत तर ज्वारी चा खप वाढण्यात शेतकऱ्यांना सहकार्य आणि महिलांना रोजगार निर्माण होईल असे उत्पादन ते विक्री चे जाळे निर्माण करण्याचे आव्हान डॉ. विजय माने यांनी या वेळी केले. कार्यक्रमाचे संचालन कुलकर्णी सर आभार पांडे साहेब प्रास्ताविक दीपक देशमुख यांनी केले.

## विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मुदतीत प्राप्त होण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने 'समता पंधरवडा'चे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने २५ एप्रिलपर्यंत जातपडताळणी विशेष मोहिम शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

समता पंधरवड्यात सन २०२३-२४ मधील विज्ञान शाखेतील प्रवेशित अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांसाठी विहित मुदतीत समितीमार्फत जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेदरम्यान संपूर्ण जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रकरणे तालुका व महाविद्यालयनिहाय संख्यात्मक माहिती महाविद्यालयस्तरावर स्थापन केलेल्या समानसंधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय व तसेच जिल्हास्तरावर संकलित करण्यात येणार आहेत.

त्याअनुषंगाने समता पंधरवड्यात जिल्ह्यातील इ. ११ व १२ विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी, सीईटी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या संबंधित महाविद्यालयात ऑनलाईन भरलेला परिपूर्ण अर्ज जमा करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावेत. तसेच सर्व कनिष्ठ विज्ञान शाखेच्या महाविद्यालयानी देखील या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे उपायुक्त तथा सदस्य यांनी केले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904